**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

**जाहिरात (वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी)**

ठाणे महानगरपालिकेच्या तरण तलाव विभागाकरीता "फिल्ट्रेशन प्लान्ट ऑपरेटर/पंप ऑपरेटर" या पदासाठी **११ महिन्याकरिता** कंत्राटी पध्दतीने पात्र व इच्छुक उमेदवारांनासाठी जाहीरात प्रसिध्द करण्यात येत आहे. ठाणे महानगरपालिकेच्या **Www.Thanecity.Gov.In** या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने त्यांचे अर्ज दि.०८/१०/२०२४ ते दि. १६/१०/२०२४ रोजीचे दुपारी ४.०० वा. पर्यंत संपूर्ण तपशीलासह भरावीत अर्ज व अर्जात नमूद केलेली सर्व कागदपत्रे ऑफलाईन पध्दतीने **नागरी सुविधा केंद्र, तळ मजला, प्रशासकिय भवन, ठाणे महानगरपालिका, (मुख्यालय),चंदनवाडी, पांचपाखाडी, ठाणे.(प)४००६०१ येथे** सादर करणे आवश्यक आहे. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

| अ.क्र | पदनाम | मानधन | एकूण जागा | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १. | फिल्ट्रेशन प्लान्ट ऑपरेटर/ पंप ऑपरेटर | रू.२१,३६५/- | २ (दोन) | १. महाराष्ट्र राज्य शासनाने मान्यता दिलेल्या शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण. (SSC)<br>२.शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील फिल्ट्रेशन प्लान्ट ऑपरेटर या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण व तदनंतर एन.सी.टी.व्ही.टी.चे प्रमाणपत्र आवश्यक.<br>३.मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |

ठाणे महानगरपालिकेच्या **Www.Thanecity.Gov.In** या संकेतस्थळावर सदरची संपुर्ण जाहिरात अटी शर्तीसह प्रसिध्द करण्यात येत आहे. उमेदवारांनी संकेतस्थळावरील जाहितीला अनुसरुन जाहिरातीत नमुद अटी व शर्तीनुसार काळजीपुर्वक संपूर्णपणे वाचून त्यानुसार अर्ज व अर्जात नमूद केलेली प्रमाणपत्रे/कागदपत्रे ऑफलाईन पध्दतीने सादर करावे. ऑफलाईन पध्दतीने प्रक्रियेशिवाय केलेले अर्ज नाकारण्यात येतील.

**अटी व शर्ती :-**

१. फिल्ट्रेशन प्लान्ट ऑपरेटर/पंप ऑपरेटर यांची नियुक्ती शासनाने सुचीत केल्या प्रमाणे विहित नियमानुसार कंत्राटी पध्दतीने असतील त्यांना सेवेत कायमस्वरुपी करण्यासाठी दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

२. निवड झालेल्या फिल्ट्रेशन प्लान्ट ऑपरेटर/पंप ऑपरेटर यांना नियमीत फिल्ट्रेशन प्लान्ट ऑपरेट करणे व त्याचे योग्य परिचलन करणे बंधनकारक असेल.

३. फिल्ट्रेशन प्लान्ट ऑपरेटर/पंप ऑपरेटर यांची कार्यालयीन वेळ सकाळी ०६:०० ते सकाळी १०:०० व दुपारी ०४:०० ते रात्रौ ०८:०० असेल.

४. निवड झालेल्या फिल्ट्रेशन प्लान्ट ऑपरेटर/पंप ऑपरेटर यांना प्रती महीना **रू.२१,३६५/-** या प्रमाणे ठोक मासिक मानधन अदा करण्यात येईल.

५. निवड झालेल्या फिल्ट्रेशन प्लान्ट ऑपरेटर/पंप ऑपरेटर यांना मासिक मानधन व्यतिरिक्त महापालिकेच्या नियमित कर्मचाऱ्याप्रमाणे इतर कोणतेही हक्क, अधिकार लाभ, मिळणार नाहीत.

६. सोमवार साप्ताहिक सुट्टी व्यतिरिक्त आपणांस कोणताही भत्ता, कायमपणाचे कोणतेही फायदे तसेच कोणत्याही प्रकारच्या रजेचा लाभ घेता येणार नाही.

७. सदरची नियुक्ती कंत्राटी पद्धतीने ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याकरिता असेल.

८. सदर पदाच्या ११ महिन्याकरिता कंत्राटी पद्धतीने मानधनावर नेमणुकीकरिता पात्र उमेदवारास उपरोक्त अटी/शर्ती नुसार रू.५०० च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे बंधनकारक आहे.

९. निवड झालेल्या फिल्ट्रेशन प्लान्ट ऑपरेटर/पंप ऑपरेटर जर अपेक्षित कामगिरी करत नसल्यास त्यांचा करारनामा रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त सो यांना असतील.

१०.सदरचे अर्ज दि.०८/१०/२०२४ पासुन दि.१६/१०/२०२४ पर्यंत स्विकारण्यात येतील, मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

११. नियुक्ती करण्यात आलेल्या फिल्ट्रेशन प्लान्ट ऑपरेटर/पंप ऑपरेटर यांनी पोलीस विभागामार्फत स्वताचे चारीत्र्य प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१२. नियुक्ती करण्यात आलेल्या फिल्ट्रेशन प्लान्ट ऑपरेटर/पंप ऑपरेटर यांनी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असले बाबतचे MBBS डॉक्टरांचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे पात्रता धारण करणाऱ्या फिल्ट्रेशन प्लान्ट ऑपरेटर/पंप ऑपरेटर यांनी उपरोक्त अटी/शर्ती प्रमाणे प्राविण्य प्रमापत्राच्या प्रमाणित छायांकित प्रतीसह वरील पत्यावर अर्ज सादर करावेत.

अर्ज करताना लिफाफ्यावर "फिल्ट्रेशन प्लान्ट ऑपरेटर/पंप ऑपरेटर कंत्राटी पध्दतीने" नेमणुक करणेकरिता असे ठळक अक्षरात नमुद करावे.

(मिनल पालांडे)
प्र.उप आयुक्त (क्रीडा)
ठाणे महानगरपालिका,ठाणे

**प्रत :- माहिती व जनसंपर्क विभाग वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी**